**प्रेसनोट दिनांक १४/०४/२०१९**

**विश्रामबाग पोलीस स्टेशन,पुणे शहर.**

**विश्रामबाग पोलीस स्टेशनचे पोलीसांच्या कर्तव्य दक्षतेमुळे महिलेला तिची दुचाकी परत मिळाली.**

दिनांक-१३/०४/२०१९ रोजी विश्रामबाग पोलीस स्टेशनचे नेमणुकीतील पोलीस हवालदार राजेश लोणकर हे सेनादत्त पोलीस चौकी येथे डयुटी अंमलदार म्हणुन कार्यरत असतांना तसेच पोलीस शिपाई योगेश एकशिंगे व शांताराम तळपे यांना मार्शल डयुटी नेमलेली असतांना एका इसमाने चौकीत येवून कळविले कि शास्त्री रोड येथे एक अगदी नवीन टि.व्ही.एस. ज्युपीटर दुचाकी गाडी कोणीतरी पार्क केलेली असुन तिचे डिक्कीला त्या गाडीची चावी तशीच लावलेली आहे. सदर वेळी पोलीस हवालदार राजेश लोणकर यांनी मार्शल डयुटीवरील पोलीस शिपाई योगेश एकशिंगे यांना सुचना देवून तात्काळ त्याठिकाणी पाठवून खात्री करण्यास सांगीतले. त्यानुसार पोलीस शिपाई एकशिंगे यांनी सदर ठिकाणी जावून गाडीची तपासणी करुन खात्री केली व कोणताही संशयास्पद प्रकार नसल्याने सदर गाडी सेनादत्त पोलीस चौकी येथे सुरक्षिततेकामी आणुन उभी केली.

त्यानंतर सुमारे तिन तासांनी एक महिला तथा वर नमुद दुचाकीचे मालक महिला हया रडत-रडत त्यांचे गाडी चोरीची तक्रार देण्यास पोलीस चौकीत आल्या. त्यावेळी पोलीस हवालदार राजेश लोणकर व पोलीस शिपाई योगेश एकशिंगे यांनी तिला धिर देवून थोडया वेळापुर्वी सेनादत्त चौकी येथे आणुन उभी केलेली तिची दुचाकी गाडी दाखवून खातरजमा केली. त्यावेळी आपली गाडी पाहुन सदर महिलेला अत्यंत आनंद झाला व सदर वेळी तीने पोलीसांचे कर्तव्यदक्षतेबाबत कौतुक करुन आभार मानले. तसेच सदर महिलेने पोलीसांच्या या चांगल्या कामगिरीबाबत पुणे पोलीसांच्या वेब-साईटवर कौतुकास्पद संदेश पाठविलेला आहे.

( एस.पी.कलगुटकर )
वरिष्ठ पोलीस निरीक्षक
विश्रामबाग पोलीस ठाणे,पुणेशहर.